Pimpalner Education Society's

Karm. A. M. Patil Arts, Commerce And Kai. Annasaheb N. K. Patil Science Sr. College Pimpalner, Tal - Sakri Dist- Dhule

# Alumni Association Senior College, Pimpalner

Reg.No.MH/42/2022 Date- 22/02/2022

| Sr. No. | Name | Designation |
|---|---|---|
| 1. | Dr. Hashim M. Isak Shaikh | President |
| 2. | Smt. Rupali Sharad Sonawane | Vice-President |
| 3. | Shri. Vishal Rajendra Gangurde | Secretary |
| 4. | Miss. Vaibhavi Anil Shimpi | Co-Secretary |
| 5. | Dr. Dhananjay Shivajirao Patil | Treasurer |
| 6. | Shri. Ramkrushna Tukaram Ekhande | Member |
| 7. | Smt. Sangita Bapu Mali | Member |
| 8. | Dr. Harshal Sahebrao Gawale | Member |
| 9. | Shri. Anil Bhaidas Mahale | Member |
| 10. | Shri. Hemraj Somnath Dashpute | Member |
| 11. | Shri. Bharat Kantilal Bagul | Member |
| 12. | Shri. Dhananjay Dilip Gawale | Member |
| 13. | Shri. Ganesh Dilip Nerkar | Member |
| 14. | Miss. Puja Hiralal Pawar | Member |
| 15. | Dr. Vaishali Sharad Shirole | Member |

महा/ 82 /धुळे
दि.22/07/22

अर्ज क्रमांक 348/22
नक्कल सेवा शुल्क रुपये: 36/-
व ती मिळण्याची दिनांक: 30/03/2022

# परिशिष्ट व
## ज्ञापन (मेमोरन्डम ऑफ असोसिएशन)

१. संस्थेच नांव :- **पिंपळनेर वरिष्ठ महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, पिंपळनेर**

२. संस्थेचा पत्ता :- **व्दारा श्री.हशीम म.इसाक शेख घर नं.१२४०,शनी गल्ली पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे**

सहाय्यक संस्था निबंधक धुळे विभाग, धुळे

प्रमाणित सत्य प्रतिलिपी

३. संस्थेचे ध्येय :- खालीलप्रमाणे

१. पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे पाटील कला,वाणिज्य आणि कै. एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालय पिंपळनेर यामधील आजी माजी विद्यार्थी एकत्रितरित्या संवाद साधण्याची आणि परस्पर संपर्क माध्यमातुन चर्चा करण्याचे साधन प्रदान करणे.

अधिक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय धुळे विभाग धुळे

१. पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे पाटील कला,वाणिज्य आणि कै. एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालय पिंपळनेर यामधील आजी माजी विद्यार्थ्यांमध्ये बंधुता, सहकार, एकमेकांमधील सुसंवाद अणि स्नेहभाव निर्माण करणे.

२. पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे पाटील कला,वाणिज्य आणि कै. एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालय पिंपळनेर या महाविद्यालयातील वर्तमान विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभुत सुविधा व सुधारणा करण्यासाठी माजी विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करणे.

३. पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे पाटील कला,वाणिज्य आणि कै. एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालय पिंपळनेर हे एक उत्कृष्ट महाविद्यालय असल्याचे माजी विद्यार्थ्यांच्या कौशल्यावर रेखाकंन व माहिती देऊन मार्गदर्शन करणे.

४. पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे पाटील कला,वाणिज्य आणि कै. एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालय पिंपळनेर महाविद्यालयाकरिता ~~दृश्ये आणि~~ अनुभव यांचे देवाण घेवाण करण्याकामी व्यासपीट निर्माण करणे आणि महाविद्यालयातील उपस्थित विद्यार्थ्यांना त्यात सामावुन घेणे.

५. पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे पाटील कला,वाणिज्य आणि कै. एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालय पिंपळनेर यामधील माजी विद्यार्थ्यांचे व वैयक्तिक व मित्रत्वाचे संबंध जोपासुन स्नेहसंमेलन सहली यांच्या माध्यमातुन आजी विद्यार्थ्यांचा विकास घडविणे. त्यांना उज्वल भविष्यासाठी उत्तेजित करणे.

६. पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे पाटील कला,वाणिज्य आणि कै. एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालय पिंपळनेर महाविद्यालयातील आजी माजी विद्यार्थ्यांसाठी मनोरंजन व मानसिग स्थैर्यासाठी करंडक स्पर्धाचे आयोजन करणे आजी माजो विद्यार्थ्यांना उपयुक्त टरेल अशी माहिती गोळा करणे व प्रसिध्दीस देणे.

७. पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे पाटील कला,वाणिज्य आणि कै. एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालय पिपळनेर या महाविद्यायातील विद्यार्थ्यांना अनुदान, शिष्यवृत्या आणि बक्षिसे यांच्या माध्यमातुन मदत करणे आणि त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार योग्द रोजगाराचे स्थान व स्वंयरोजगाराबाबत मार्गदर्शन करणे.

८. पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे पाटील कला,वाणिज्य आणि कै. एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालय पिंपळनेर महाविद्यातील विद्याथ्यांचा सर्वांगीण विकास व व्यक्तीमत्व विकसित करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करणे.

९. पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे पाटील कला,वाणिज्य आणि कै. एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालय पिपळनेर या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या क्रिडा स्पर्धामध्ये भाग घेण्यास प्रवृत्त करुन राष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय क्रिडा स्पर्धात भाग घेण्यास मदत करुन महाविद्यालयातुन उत्कृष्ट खेळाडु घडविणे.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

१०. पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे पाटील कला,वाणिज्य आणि कै. एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालय पिंपळनेर यामधील आजी माजी विद्यार्थ्यांमध्ये सांगड घालुन त्यांच्या मधील व्यवसायिक व रोजगार विषयक ~~कलागुणांना वाव देणे.~~ मार्गदर्शन करणे व.

११. पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे पाटील कला,वाणिज्य आणि कै. एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालय पिंपळनेर यामधील आजी माजी विद्यार्थ्यांमध्ये विचार विनिमय करुन त्यांना आवश्यक ती सर्वोतोपरी मदत करणे आजी माजी विद्यार्थ्यांचा विकास होण्याकामी आवश्यक उपाय योजना करुन महाविद्यालयास नावलौकिक प्राप्त होईल अशा स्वरुपाचे कार्य करणे.

१२. पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे पाटील कला,वाणिज्य आणि कै. एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालय पिंपळनेर या मधील आजी माजी विद्यार्थ्यांसाठी व्यायामशाळा सुरु करणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन देणे. रक्तदान शिबिर वृक्षोरोपण करणे.

**वरील सर्व उद्देश अव्यवसायिक तत्वावर राबविण्यात येतील**

४. संस्थेचे नाव पिंपळनेर वरिष्ट महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, पिंपळनेर या संस्थेचे नियम व निबंधाप्रमाणे कारभार पाहण्याची जबाबदारी ज्या कार्यकारी मंडळावर सोपविण्यात आली आहे, अशा कार्यकारी मंडळातील सभासदांची नांवे, पत्ते, वय, हुद्दा, व्यवसाय पुढीलप्रमाणे

| अ.क्र | संपूर्ण नांव व पत्ता | पत्ता | हुद्दा | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.हाशीम म.इसाक शेख | १३, अविष्कार कॉलनी चाळीसगाव रोड धुळे ता.जि.धुळे | अध्यक्ष | ४९ | प्राध्यापक | भारतीय |
| २ | श्रीमती रुपाली शरद सोनवणे | मु.पो.देशशिरवाडे ता.साक्री जि.धुळे | उपाध्यक्ष | ३८ | नोकरी | भारतीय |
| ३ | श्री.विशाल राजेंद्र गांगुर्डे | शनि मंदीर जवळ शनी गल्ली पिंपळनेर ता.साक्री.जि.धुळे | सचिव | ३९ | नोकरी | भारतीय |
| ४ | श्रीमती वैभवी अनिल शिंपी | मु.पो.सामोडे ता.साक्री जि.धुळे | सहसचिव | २२ | शिक्षण | भारतीय |
| ५ | श्री.धनंजय शिवाजीराव पाटील | एन के पाटील नगर सटाणा रोड पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | खजिनदार | ३५ | नोकरी | भारतीय |
| ६ | श्री.रामकृष्ण तुकाराम एखंडे | जुनी पोलीस लाईन समोर एखंड गल्ली गोपाळ नगर पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | सदस्य | ५२ | नोकरी | भारतीय |
| ७ | श्रीमती संगिता बापु माळी | मुरलीधर मंदीराजवळ जोर गल्ली गोपाळ नगर पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | सदस्य | ४५ | नोकरी | भारतीय |
| ८ | श्री.हर्षल साहेबराव गवळे | महाजन लॉज मार्गे सहनी सदन शिवाजी नगर सटाणा रोड पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | सदस्य | ३५ | नोकरी | भारतीय |
| ९ | श्री अनिल भाईदास महाले | प्लॉट नं.१०, विद्या नगर एसटी स्टॅन्ड जवळ पिपळनेर ता.साक्री जि.धुळे | सदस्य | ४६ | नोकरी | भारतीय |
| १० | श्री.हेमराज सोमनाथ दशपुते | साईबाबा कॉलनी पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | सदस्य | ४३ | व्यापार | भारतीय |
| ११ | श्री.भरत कांतीलाल बागुल | मु.पो.पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | सदस्य | ४० | व्यापार | भारतीय |
| १२ | श्री.धनंजय दिलिप गवळे | महावीर भवन जवळ सटाणा रोड पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | सदस्य | ३४ | नोकरी | भारतीय |
| १३ | श्री.गणेश दिलिप नेरकर | भोई गल्ली पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | सदस्य | ३५ | नोकरी | भारतीय |
| १४ | श्रीमती पुजा हिरालाल पवार | संजय नगर पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | सदस्य | २२ | शिक्षण | भारतीय |
| १५ | श्रीमती वैशाली शरद शिरुळे | भाटे वाडी समोर लवण गल्ली पारोळा ता.जि.जळगाव | सदस्य | ४९ | नोकरी | भारतीय |

५. आम्ही खालील स्वाक्षरी करणारे पिंपळनेर वरिष्ट महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, पिंपळनेर या संस्थेचे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येवून पिंपळनेर वरिष्ट महाविद्यालय माजी विद्यार्थी

असोसिएशन, पिंपळनेर ही संस्था आज दि. १ / ८ /२०२१ रोजी स्थापन केली असून संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर स्वाक्षरी केल्या आहेत.

| अ.क्र. | संपूर्ण नांव व पत्ता | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्री.हाशीम म.इसाक शेख १३, अविष्कार कॉलनी चाळीसगाव रोड धुळे ता.जि.धुळे | |
| २ | श्रीमती रुपाली शरद सोनवणे मु.पो.देशशिरवाडे ता.साक्री जि.धुळे | |
| ३ | श्री.विशाल राजेंद्र गांगुर्डे शनि मंदीर जवळ शनी गल्ली पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | |
| ४ | श्रीमती वैभवी अनिल शिंपी मु.पो.सामोडे ता.साक्री जि.धुळे | |
| ५ | श्री.धनंजय शिवाजीराव पाटील एन के पाटील नगर सटाणा रोड पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | |
| ६ | श्री.रामकृष्ण तुकाराम एखंडे जुनी पोलीस लाईन समोर एखंड गल्ली गोपाळ नगर पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | |
| ७ | श्रीमती संगिता बापु माळी मुरलीधर मंदीराजवळ जीरे गल्ली गोपाळ नगर पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | |
| ८ | श्री.हर्षल साहेबराव गवळे महाजन लॉज मार्गे सक्नी सदन शिवाजी नगर सटाणा रोड पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | |
| ९ | श्री.अनिल भाईदास महाले प्लॉट नं.१०, विद्या नगर एसटी स्टॅन्ड जवळ पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | |
| १० | श्री.हेमराज सोमनाथ दशपुते साईबाबा कॉलनी पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | |
| ११ | श्री.भरत कांतीलाल बागुल मु.पो.पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | |
| १२ | श्री.धनजय दिलिप गवळे महावीर भवन जवळ सटाणा रोड पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | |
| १३ | श्री.गणेश दिलिप नेरकर भोई गल्ली पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | |
| १४ | श्रीमती पुजा हिरालाल पवार संजय नगर पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | |
| १५ | श्रीमती वैशाली शरद शिरुळे भाटे वाडी समोर लवण गल्ली पारोळा ता.जि.जळगाव | |

वरील इसमांना मी ओळखतो व त्यांनी माझ्या समक्ष विधानपत्रावर स्वाक्षऱ्या केल्या कार्यकारी दंडाधिकारी

स्थळ :- धुळे
दिनांक :- ३०/११/२०२१

Devendrakumar B. Shirode
ADVOCATE
Convent School, Station Road, Dhule.
Reg No MAH/...

(विशेष कार्यकारी दंडाधिकारी/विधिज्ञ/सनदी लेखापाल/ नोटरी सपुंर्ण नाव व पत्ता शिक्का)

महा/ ८२/धुळे
दि. २२/०२/२०२५

## परिशिष्ट 'क'
## नियम व नियमावली

सहाय्यक संस्था निबंधक, धुळे विभाग, धुळे

१. **नियमावलीतील संदर्भिय शब्दाची व्याख्या**

**अ. संस्था :-** संस्था म्हणजे पिंपळनेर वरिष्ठ महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, पिंपळनेर संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंद होणारी संस्था.

**ब. अध्यक्ष :-** अध्यक्ष म्हणजे पिंपळनेर वरिष्ठ महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, पिंपळनेर या संस्थेचा अध्यक्ष.

**क. उपाध्यक्ष :-** उपाध्यक्ष म्हणजे पिपळनेर वरिष्ठ महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, पिंपळनेर या संस्थेचा उपाध्यक्ष.

**ड. सचिव :-** सचिव म्हणजे पिंपळनेर वरिष्ठ महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, पिंपळनेर या संस्थेचा सचिव.

**इ.सहसचिव :-** सहसचिव म्हणजे पिंपळनेर वरिष्ठ महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, पिंपळनेर या संस्थेचा सहसचिव.

**ई. खजिनदार :-** खजिनदार म्हणजे पिंपळनेर वरिष्ट महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, पिंपळनेर या संस्थेचा खजिनदार

**उ. सभासद :-** सभासद म्हणजे पिंपळनेर वरिष्ठ महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, पिंपळनेर या संस्थेचा सभासद.

या संस्थेची वर्गणी भरुन झालेला संस्थापक, आजीव सभासद, वार्षिक सभासद व कार्यकारी निवडून आलेले सभासद.

२. **कार्यक्षेत्र** :- संपुर्ण भारत देशात राहील.

३. **हिशोबाचे वर्ष** :- संस्थेच्या हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

४. **सभासदत्व व त्यांची नोंदणीची पध्दत :-**

अ) संस्थेचे ध्येय, उद्देश व नियमावली मान्य असणा-या भारतीय सज्ञान वयाची १८ वर्षे पूर्ण करणा-या पिपळनेर एज्युकेशन सोसायटीचे पाटील कला,वाणिज्य आणि कै. एन.के. पाटील विज्ञान महाविद्यालय पिपळनेर या महाविद्यालयातील केवळ आजी माजी विद्यार्थ्यास या संस्थेचे सभासद होता येईल.

ब) सभासद होण्यासाटी त्याने संस्थेस लेखी अर्ज करावा.

क) कार्यकारी मंडळाचा याबाबतचा निर्णय हा अंतिम राहील.

५. **सभासदांचे प्रकार :-**

अ) **संस्थापक सदस्य :-** संस्थेच्या निर्मिती लेखावर म्हणजे संस्था स्थापन करतांना संस्थेच्या विधानपत्रावर ज्यांनी सह्या केल्या व रुपये ५०१/- रोख देवून संस्थेला योगदान दिले असे प्रथम १५ सभासद संस्थापक सभासद म्हणून ओळखले जातील. त्यांना पुन्हा सभासद फी भरण्याची आवश्यकता नाही.

ब) **आजीव सभासद :-** संस्थेस सभासद वर्गणी म्हणून रक्कम रुपये १०००/- देणाऱ्या व्यक्तीस आजीव सभासद संबोधण्यात येईल. त्यास पुन्हा सभासद वर्गणी भरण्याची आवश्यकता राहणार नाही.

क) **सर्वसाधारण सभासद :-** वार्षिक सभासद फी रुपये १००/- भरणाऱ्या सर्वसाधारण सभासद संबोधण्यात येईल.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

**६. सभासदत्व रद्द होणेबाबत :-**

१. कोणताही सभासद कायदेशीर गुन्हेगार ठरुन शिक्षा झाल्यास.

२. सभासद वर्गणी दिली नसेल.

३. राजीनामा दिल्यास तो राजीनाम कार्यकारी मंडळाने मंजूर केल्यास.

४. मयत झाल्यास.

५. देश सोडून गेला असेल.

६. व्यसनी किंवा गैरवर्तणुक करील असेल.

७. संस्थेला हानी किंवा नुकसान पोहचवित असेल.

८. योग्य कारणावरुन कार्यकारी मंडळाने बहूमताने ठराव मंजूर करुन काढून टाकल्यास सभासदत्व रद्द झाले असे समजले जाईल.

९. अध्यक्षांच्या पूर्व परवानगीशिवाय सतत ३ सभांना गैरहजर राहिल्यास.

**७. सर्वसाधारण सभा तिचे अधिकार व कर्तव्ये :-**

सर्वसाधारण सभा म्हणजे संस्थेच्या सभासदांनी सभा संस्थेच्या आर्थिक वर्ष संपल्यानंतर दोन महिन्याचे आत वार्षिक सर्वसाधारण सभा घेतली जाईल. सर्वसाधारण सभेची कार्य व अधिकार खालीलप्रमाणे:-

**अ)** मागील सर्वसाधारण सभेचा वृत्तांत निर्णय वाचून कायम करणे.

**ब)** वार्षिक अंदाजपत्रक, जमाखर्चाचे अहवाल वाचून कायम करणे.

**क)** संस्थेचा वार्षिक जमाखर्च मंजूर करणे, वार्षिक अहवाल मंजूर करणे. कार्यकारिणीच्या आर्थिक धोरणात्मक स्वरुपाचे ठरावांना मान्यता देणे.

**ड)** आयत्या वेळी येणाऱ्या विषयावर अध्यक्षांचे संमतीने निर्णय घेणे.

**इ)** संस्थेच्या मालमत्ता विक्री संबंधी ट्रस्ट नोंदणी कायदा १९५० व संस्था नोंदणी कायदा १८६० ला अनुसरुन व त्यातील कलमास अनुसरुन निर्णय घेणे.

**फ)** मुदत संपलेली असल्यास कार्यकारी मंडळाची पुढील पाच वर्षाकरीता निवडणूक करणे.

**८. सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या :-**

सर्वसाधारण सभेची सुचना ही प्रत्येक सभासद सभेच्या तारखेच्या १५ दिवस अगोदर पोस्टाने किंवा समक्ष देण्यात येईल. त्या सुचनेवर सभेचे ठिकाण, वेळ, विषय व दिनांक लिहीलेली असेल. या सभेत १/३ सभासदांची गणसंख्या असेल. जर गणसंख्या पूर्ण झाली नाही तरी सभा तहकुब ठेवण्यात येईल. अशी तहकुब झालेली सभा ठरलेल्या वेळेनंतर १ तासाने त्याच ठिकाणी घेण्यात येईल. अशा तहकुब झालेल्या सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही. मात्र सभेच्या जाहीर केलेल्या विषयाव्यतिरिक्त इतर कोणत्याही विषयावर त्या सभेत निर्णय घेतले जाणार नाही.

**९. विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्ये :-**

काही महत्वाच्या व तातडीच्या कामासाठी सर्वसाधारण सभा घेतली जाईल. त्यास विशेष सर्वसाधारण सभा संबोधली जाईल. या सभेत २/३ सभासदांची गणसंख्या राहील. या सभेत १५ दिवसांची नोटीस पोस्टाने वा समक्ष दिली जाईल.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

**१०. कार्यकारी मंडळ व पदाधिकारी यांची रचना :-**

**अ)** संस्थेचे कार्यकारी मंडळ हे कमीत कमी ०७ सदस्यांचे आणि जास्तीत जास्त १५ सदस्यांचे राहील

ब) कार्यकारी मंडळावर संस्थेच्या सर्व सभासद निवडून जाता येईल. संस्थेच्या कार्यकारी मंडळात खालील प्रमाणे पदाधिकारी असतील.

१ - अध्यक्ष, १ - **उपाध्यक्ष, १ - सचिव, १- सहसचिव, १- खजिनदार इतर** सदस्य असतील. संस्थेच्या कार्यकारी मंडळातील पदाधिकाऱ्यांची निवड कार्यकारी मंडळावर निवडून आलेले कार्यकारी सदस्य आपआपसात बहुमताने करतील. ११. **कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणुकीची पध्दत :-**

पहिले कार्यकारी मंडळ हे ५ वर्षांचे असेल. त्यानंतर सर्वसाधारण सभेत निवडून आलेल्या कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हा ५ वर्षांचा असेल. कार्यकारी मंडळाच्या सभासदांची निवड दर ५ वर्षांनी सर्वसाधारण सभेत बहुमताने किंवा आवाजी मतदान हात वर करुन करण्यात येईल.

**१२. कार्यकारी मंडळातील पदाधिकारी व त्यांची कार्ये :-**

अ) **अध्यक्षांची कार्ये व अधिकार**

१. संस्थेच्या सर्व सभा व्यवस्थित चालविणे व त्यांचे संचालक करणे, सभा बोलविणे.

२. संस्थेच्या कारभारावर संपूर्ण नियंत्रण ठेवणे. सभेत समान मते पडल्यास निर्णायक जादा मत देणे.

३. बँक व्यवहार सांभाळणे. कर्मचारी नियुक्ती करणे.

ब) **उपाध्यक्षांची कार्ये व अधिकार :-**

१. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत अध्यक्षांचा अधिकार वापरणे. संस्थेच्या कारभारावर संपूर्ण नियंत्रण ठेवणे.

२. सभेत समान मते पडल्यास निर्णास जादा मत देणे.

**क) सचिवाची कार्ये व अधिकार:-**

१. संस्थेचा सर्व प्रकारचा पत्र व्यवहार पाहणे.संस्थेच्या **सर्व** सभांचे इतिवृत्त (प्रोसिडींग) लिहणे व ताब्यात ठेवणे.संस्थेच्या सभांमधील झालेल्या टरावांची अंमलबजावणी करणे.

२. संस्थेचे हिशोब पडताळूण पाहणे.अध्यक्ष, उपाध्यक्ष यांना त्यांच्या कार्यात मदत करणे.

३. संस्थेचे बँकेतील व्यवहार करण्यासाठी अध्यक्ष, खजिनदार व सचिव यांच्या संयुक्त स्वाक्षरीने व्यवहार करणे. यापैकी कोणत्याही दोघांच्या स्वाक्षरीने बँकेचे व्यवहार पार पाडले जातील.

**ड) सहसचिवाची कार्ये :-**

१. सचिवाच्या गैरहजेरीत कामकाज पाहणे.अध्यक्षांच्या आदेशाचे पालन करणे.

२. न्यासाच्या हितार्थ कामकाज पाहणे.

**ड) खजिनदाराची कार्ये :-**

१. संस्थेचे आर्थिक व्यवहारांचा लेखा ठेवणे.बँकेचे व आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवणे व व्यवहार करणे.संस्थेच्या व्यवहारांचे लेखा परिक्षण करुन त्याचा अहवाल सादर करणे.

२. संस्थेचा आर्थिक अंदाजपत्रक सादर करणे. सर्व आर्थिक बाबींवर नियंत्रण ठेवणे व नोंदी ठेवणे.

**इ) कार्यकारी सदस्य :-**

१. अध्यक्षांच्या आदेशाचे पालन करणे. सचिवाच्या कामात परवानगीनुसार मदत करणे. सर्व सभांना हजर राहणे. न्यासाच्या हितार्थ कामकाज करणे निवडणुकीस मदत करणे. न्यासाला सुयोग्य निर्णय घेण्यास मदत करणे.

**अध्यक्ष** उपाध्यक्ष सचिव

१३. **कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा**

कार्यकारी मंडळाची सभा ही जास्तीत जास्त ३ महिन्यातून एकदा घेण्यात येईल. अशा प्रकारे एका वर्षांत कमीत कमी चार सभा घेण्यात येतील. तसेच महत्त्वाच्या अथवा तातडीच्या कामासाठी कार्यकारी मंडळाची सभा बोलविण्यात येईल. त्यासाठी कमीत कमी एक तृतीयांश सभासदांची अध्यक्षांकडे लेखी स्वरुपात मागणी करणे आवश्यक आहे. तिला मागणिची सभा किंवा तातडीची सभा असे संबोधण्यात येईल. तातडीची सभा किंवा मागणिची सभा बोलविण्याचा अधिकार संस्थेच्या अध्यक्षांना राहील. सदर सभा सदस्यांनी लेखी मागणी केल्यापासून अध्यक्षांनी १५ दिवसांच्य आत न बोलविण्यास मागणी करुन सभासद अशी सभा बोलवतील.

१४. **कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या :-**

प्रत्येक कार्यकारी मंडळाची सुचना व ही सभेच्या तारखेच्या सात दिवसाअगोदर पोस्टाने वा समक्ष दिली जाईल. सभेला कार्यकारी मंडळातील सदस्यांची गणसंख्या ही २/३ राहील. पण गणसंख्येअभावी सभा जर तहकुब झाली तर तहकुब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेनंतर एका तासाने घेण्यात येईल. अशा तहकुब सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही. मात्र अशा सभेत विषय पत्रिकेशिवाय कोणत्याही विषयावर चर्चा होणार नाही. अथवा निर्णय घेतले जाणार नाही. महत्त्वाच्या अथवा तातडीच्या कामासाठी जी सभा बोलविण्यात येईल. त्या सभेला पाच दिवसांची नोटीस अथवा सुचना पोस्टाने समक्ष देण्यात येईल. या सभेला गणसंख्येचे नियम हे वरीलप्रमाणे असतील.

१५. **कार्यकारी मंडळाचे निवडणूकीचे नियम :-**

अ) कार्यकारी मंडळ निवडणूकीचे नियम सर्व साधारण सभेत ठरविल्याप्रमाणे राहतील.

ब) ज्या सभासदांकडे संस्थेची कोणतीही रक्कम येणे बाकी आहे अशा सभासदाला निवडणूकीत उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही व मतदान करण्याचा सुध्दा हक्क राहणार नाही.

१६. **कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबतः-**

कार्यकारी मंडळातील पद अथवा जागा नियम क्रमांक ६ प्रमाणे व पुढील कारणाने सभासद मृत्यूमुळे, राजीनामा दिल्यामुळे व तो कार्यकारी मंडळाने मंजूर केल्यास, वेडा झाल्यास, कार्यकारी मंडळातील एखादं पद रिक्त झाल्यास उर्वरीत सभासद संस्थेच्या सर्व सभासदांमधून उर्वरीत कालावधीसाठी त्यांचे बहुमताने असे रिक्तपद या जागा भरून काढतील.

१७. **कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :-**

अ) संस्थेच्या उद्देशाकरीता निधी जमा करणे, वाटविणे, त्याचा विनियोग करणे, योग्य अशी गुंतवणूक करणे, देणग्या, शासकीय व निमशासकीय अनुदान स्विकारणे.

ब) ट्रस्ट नोंदणी कायदा १९५० व त्या खालील नियमांना अनुसरुन संस्थेच्या उद्देशापूर्तीसाठी कर्ज घेणे व ठेवी स्विकारणे.

क) दैनंदिन खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करणे व त्याखालील रक्कम मंजूर करणे व खर्चास वेळोवेळी मंजूरी देणे.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

ड) संस्था नोंदणी कायदा १९५० च्या नियमांना अधिन राहून संस्थेच्या नावाने जंगम व स्थावर मिळकत खरेदी करणे व त्यावर इमारती वा वास्तु बांधणे, गहाण ठेवणे व त्या भाडयाने वा लिज पध्दतीने देणे व त्यांचा उपयोग करुन संस्थेच्या उद्दिष्टांची पूर्ती करणे.

इ) संस्थेच्या उपक्रमाच्या व योजनांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या विषय समित्या या पोटसमित्या नेमणे, त्यांची सदस्य संख्या, कार्यकाल, कार्यक्षेत्र, कार्यपध्दती, अर्थव्यवस्था वगैरे सर्व ठरविणे.

फ) आवश्यक तो नोकर वर्ग नेमणे, त्यांचे पगार ठरविणे व त्यांना सेवेतून मुक्त करणे.

ग) कार्यकारी मंडळावर मुदती आधी जागा रिकामी झाल्यास ती बहुमताने भरुन काढणे. संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या इतर शाखावर नियंत्रण ठेवणे.

ह) सनदी लेखापाल (ऑडिटर) यांची नेमणुक करणे.

प) तसेच ट्रस्ट नोदणी कायदा १९५० व संस्था नोंदणी कायदा १८६० ला अनुसरुन उद्देशापूर्तीसाठी कार्य करणे.

## १८. संस्थेचा निधी, मिळकती व विनियोग :-

संस्थेचा निधी व देणग्या व शासकीय व निमशासकीय अनुदाने स्विकारुन देणग्या गोळा करुन करण्यात येईल व तो सातत्याने वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. निधी व मिळकतीच्या विनीयोग संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी करण्यात येईल. देणगी, दान, वर्गणी, इमारत निधी, बक्षिस पत्र, मृत्यूपत्र याव्दारे जमा होणारी रक्कम, संस्थेची जंगम मालमत्ता राहील.

## १९. उद्दिष्टनिहाय खर्चाची तरतूद :-

ज्या उद्देशाने रक्कम गोळा केली असेल त्या उद्दिष्टावर ती शंभर टक्के खर्च केली जाईल.

## २०. कर्ज किंवा ठेवी यासंबंधीची तरतूद :-

संस्थेच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी सार्वजनिक न्यास नोंदणी अधिनियम १९५० चे कलम ३६ ला अधिन राहून कार्यकारी मंडळाचे ठरावानुसार अध्यक्ष व सचिव संस्थेस लागणारी कर्ज घेतील व ठेवी स्विकारतील व या कर्जाचा या ठेवीचा योग्य तो वापर झाला किंवा नाही यांची जबाबदारी कार्यकारी मंडळावर राहील. कर्ज वा ठेवी मा. धर्मादाय सह आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांची पूर्व परवानगी घेण्यात येईल.

## २१. स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणे याबाबतची तरतुद :-

ट्रस्ट कायदा १९५० चे अधिन राहून संस्था स्थावर मालमत्ता खरेदी वा विक्री करेल. अथवा भाडयाने घेईल व देईल. अथवा गहाण ठेवेल वा लायसिंग पध्दतीने देईल. या मिळकतीपासून मिळणारे उत्पन्न हे संस्थेच्या अधिन उद्दिष्टपुर्तीसाठी वापर करण्यात येईल. याबाबतचे व्यवहार मा. धर्मादाय सह आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे पूर्व परवानगीने करण्यात येईल.

## २२. बँक खाते वा संस्थेचा आर्थिक व्यवहार :-

संस्थेकडे येणाऱ्या निधीपैकी रुपये ५००/- इतकी रक्कम हाती ठेवून बाकीची रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत अथवा मान्यताप्राप्त सहकारी बँकेत खाते उघडून संस्थेच्या नावाने ठेवता येईल. बँकेचे खात्यातील व्यवहार हे अध्यक्ष, सचिव व खजिनदार यापैकी दोघांच्या संयुक्त स्वाक्षरीने होतील.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

२३. **सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत :-**

सन १९७१ च्या संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियमामध्ये उल्लेख केलेली अनुसूची १, २ व ६ मध्ये कार्यकारी मंडळाची व सर्व सभासदांची यादी व संस्थेमध्ये असलेला नोकर वर्गाची यादी ठेवण्यात येईल व वेळोवेळी मा. सहाय्यक संस्था निबंधक यांना कळविण्यात येईल. सोबत अनुसूची १, २ व ६ जोडलेले आहेत.

२४. **नियम व नियमावलीत बदल करण्याची तरतूद :-**

संस्थेच्या नियम आणि नियमावलीत बदल करावयाचा असल्यास वार्षिक सर्वसाधारण सभेत अथवा विशेष सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदाच्या ३/५ बहुमताने ठराव मंजूर करुन नियमावलीत बदल करता येईल. संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १२ व १२ अ चा अवलंब केला जाईल.

२५. **संस्थेच्या नावात व उद्देशात बदल करण्याची तरतूद :-**

संस्थेच्या नावात व उद्देशात बदल करावयाचा असल्यास सभेस उपस्थित सभासदांच्या ३/५ बहुमताने व नियमाने उद्देशात आवश्यक तो बदल व वाढ करण्यात येईल. यासाठी संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधील नियम १२ व १२ अ चा अवलंब केला जाईल.

२६. संस्थेचे विसर्जन :-

कोणत्याही कारणास्तव संस्था विसर्जित अथवा बंद करावयाची असल्यास सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० अन्वये कलम १३ व १४ नुसार संस्था बरखास्त केली जाईल. सदर संस्थेची सर्व देणी देवून शिल्लक राहिलेली मालमत्ता या प्रकारच्या उद्देश असणाऱ्या सोसायटी नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेकडे वर्ग करता येईल किंवा विलीन करता येईल.

*** दाखला ***

प्रमाणित करण्यात येते की, पिंपळनेर वरिष्ठ महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, पिंपळनेर या संस्थेची नियम नियमावलीची ही सत्यप्रत आहे.

| अ.क्र | संपूर्ण नांव | | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १ | श्री.हाशीम म.इसाक शेख १३, अविष्कार कॉलनी चाळीसगाव रोड धुळे ता.जि.धुळे | अध्यक्ष | [सही] |
| २ | श्रीमती रुपाली शरद सोनवणे मु.पो.देशशिरवाडे ता.साक्री जि.धुळे | उपाध्यक्ष | [सही] |
| ३ | श्री.विशाल राजेंद्र गांगुर्डे शनि मंदीर जवळ शनी गल्ली पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे | सचिव | [सही] |

स्थळ :- धुळे
दिनांक :- ३०/११/२०१९

नक्कल अर्ज मिळाल्याचा दि. 08/03/2022
नक्कल दिल्याचा दि.: 30/03/2022
नक्कल तयार करणार: [सही]

प्रमाणित सत्य प्रतिलिपी
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
धुळे विभाग धुळे